# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - सखी हे सूर मज तारिती (उत्तेजनार्थ क्रमांक विजेती कविता)
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. स्वाती श्रीनिवास जोशी

---

अनाहताच्या सामर्थ्याची देत मजला प्रचीती |
हरवणाऱ्या वळणांवरती सखी हे सूर मज तारिती ||

पहाट वेळी मधुर भैरवी, द्विज हे भूपही आळविती
कणकणातुन जणू जागवित, या जगण्याची प्रीती ||
सखी हे सूर मज तारिती ||

कधि ग्रीष्माच्या खिन्न दुपारी, सारंग बहरतो बहाव्यापरी |
अशाश्वताच्या पाचोळ्यावर, मल्हारसरी बरसती ||
सखी हे सूर मज तारिती ||

सांजवेळच्या व्याकुळतेवर, आल्हादाचे करुनि शिंपण |
प्राजक्ताचा गंध जणू ही, सावरते मज मधुवंती ||
सखी हे सूर मज तारिती ||

केदार होतसे सखा श्रीहरी, हात घेतसे हाती |
श्रांत क्लान्त हृदया रात्री, यमन कलावती शांतविती ||
सखी हे सूर मज तारिती ||

सूर हे विश्वरूपाचे लेणे, अनवरत कृपेचे देणे |
तिमिरामध्ये धवल चांदणे, जोडिती अनाहताशी नाती
सखी हे सूर मज तारिती ||
हरवणाऱ्या वळणांवरती, सखी हे सूर मज तारिती ||

Anahat Music Therapy